# कनानच्या विजयात सर्पाचे प्रकटीकरण



एड्रियन एबेन्स

# कनानच्या विजयात सर्पाचे प्रकटीकरण

एड्रियन एबेन्स

Printed in Australia by

MARANATHA
MEDIA
maranathamedia.com

ऑगस्ट 31, 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई सुनीता मोहिते ह्यांनी मदत केली आहे.

# सामग्री


वास्तविकतेचा सामना करणे....................4

एक गंभीर प्रश्न ज्याला प्रत्येकाने सामोरे गेलेच पाहिजे....................5

सैतानाने देवाचे विकृत केलेले स्वरूप....................7

कनान घेण्याची देवाची मूळ योजना.................... 9

इस्राएलाचे देवाबद्दलचे भय....................9

अमालेकसोबतचा एक महत्त्वाचा क्षण.................... 10

वारशाने मिळालेली तलवार.................... 12

चाळीस वर्षांनंतर....................15

मोशे आज्ञाभंगात खडकावर प्रहार करतो....................17

इस्राएलाने प्रतिज्ञा घेतली.................... 18

देव इस्राएलाला जे हवे होते ते देत आहे.................... 20

दहशतीच्या मूर्तीचे प्रकाशन....................22

दया न दाखवता न्याय.................... 23

गौरवाची झलक....................25

ख्रिस्ताच्या प्रकाशात देवाला पाहणे.................... 26

## वास्तविकतेचा सामना करणे

अनुवाद २:३४ त्या वेळी आपण त्याची सर्व नगरे घेतली आणि प्रत्येक नगराचा, त्यांतील पुरुष, स्त्रिया व मुलेबाळे ह्यांच्यासह समूळ नाश केला; आपण त्यांतला कोणीही शिल्लक ठेवला नाही;

बायबलमधील अशा उताऱ्यांचे वाचन करणे हे आपल्या आत्म्यातून भयचकित करणारा विचार उठल्याशिवाय शक्य नाही. काही जण कदाचित युद्ध करणाऱ्या पुरुषांच्या संहाराचे समर्थन करण्याचा मार्ग शोधतात, परंतु एखाद्या इस्राएली सैनिकाच्या तलवारीच्या टोकावर एका लहान बाळाला भोसकून टाकलेले आहे असे दृश्य डोळ्यासमोर आणणेही अशक्य आहे. मला ठाऊक नाही तुमच्यासाठी हे कसे आहे, पण माझ्यासाठी हे एक प्रचंड घृणास्पद वाटणारे दृश्य आहे. आणि याहून अधिक भीषण गोष्ट म्हणजे बायबल हे केवळ अशा कृतींना मान्यता देते असेच दिसत नाही, तर त्या करण्याची आज्ञा देते असे वाटते.

अनुवाद ७:२ आणि तुझा देव परमेश्वर त्यांना तुझ्या हवाली करील व तू त्यांचा पराभव करशील, तेव्हा त्यांचा समूळ नाश कर; त्यांच्याशी करारमदार करू नकोस व त्यांच्यावर दया करू नकोस.

यहोशवा ११:१२ परमेश्वराचा सेवक मोशे ह्याच्या आज्ञेप्रमाणे यहोशवाने त्या राजांची सर्व नगरे सर्व राजांसह हस्तगत करून त्यांना तलवारीने ठार मारले व त्यांचा समूळ नाश केला.

यहोशवा १०:२० ह्या प्रकारे यहोशवाने त्या सर्व देशाचा म्हणजे डोंगराळ प्रदेश, नेगेब, तळवट व उतरण ह्यांतील सर्व प्रांत आणि त्यांचे राजे ह्यांचा धुव्वा उडवला; कोणालाही जिवंत राहू दिले नाही; इस्राएलाचा देव परमेश्वर ह्याने आज्ञा केल्याप्रमाणे सर्व प्राण्यांचा त्याने समूळ नाश केला.

असे प्रतिपादन केले गेले आहे की “पूर्णपणे नाश करणे” किंवा ज्याला बंदी म्हणतात, हा शब्द चुकीच्या अर्थाने समजला जाऊ शकतो. कारण जर एखाद्या लोकसमूहाला पूर्णतः नष्ट करून नकाशावरूनच पुसून टाकले गेले असेल, तर मग त्यांच्या बरोबर आंतरविवाह करू नका अशी आज्ञा देण्याची गरजच काय?

अनुवाद ७:२-४ आणि तुझा देव परमेश्वर त्यांना तुझ्या हवाली करील व तू त्यांचा पराभव करशील, तेव्हा त्यांचा समूळ नाश कर; त्यांच्याशी करारमदार करू नकोस

व त्यांच्यावर दया करू नकोस. त्यांच्याशी सोयरीक करू नकोस; आपल्या मुली त्यांच्या मुलांना देऊ नकोस व त्यांच्या मुली आपल्या मुलांना करू नकोस; कारण ते लोक तुझ्या मुलाला माझ्यापासून बहकवतील; आणि अन्य देवांची सेवा करायला लावतील. त्यामुळे तुमच्यावर परमेश्वराचा कोप भडकेल व तो तात्काळ तुमचा नाश करील.

हा उघड विरोधाभास कदाचित अशा रीतीने सोडविता येईल की इस्राएलाला आज्ञा देण्यात आली होती की त्यांनी एखाद्या शहराकडे जाऊन त्याला प्रथम शांतीचा प्रस्ताव द्यावा; आणि जर त्या शहराने शांती मान्य केली, तर ते शहर इस्राएलाला कर देणारे व्हायचे, आणि त्यांच्या मूर्ती व त्यांच्या उपासनेची पद्धती नष्ट करायची होती.

अनुवाद २०:१०-११ युद्ध करायला तू एखाद्या नगरावर स्वारी करशील तेव्हा त्याच्याशी तहाचे बोलणे करून पाहा. त्या नगराने तहाचे बोलणे कबूल करून वेस उघडली तर त्या नगरात जे लोक सापडतील ते तुझे वेठबिगार करणारे व दास होतील.

अनुवाद ७:५ त्या लोकांशी तुम्ही अशा प्रकारे वागावे : त्यांच्या वेद्या पाडून टाका, त्यांचे स्तंभ फोडून टाका, त्यांच्या अशेरा मूर्ती तोडून टाका आणि त्यांच्या कोरीव मूर्ती अग्नीत जाळून टाका.

जरीही आपण या मुद्द्यांना परवानगी दिली तरी ते ख्रिस्ताच्या शिकवणीसमोर खूपच कमी पडतात.

मत्तय २६:५२ तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील.

लूक ९:५४-५६ तेव्हा त्याचे शिष्य याकोब व योहान हे पाहून म्हणाले, “हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीने पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?” परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, “तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले.

## एक गंभीर प्रश्न ज्याला प्रत्येकाने सामोरे गेलेच पाहिजे

हे खरे तर आश्चर्यकारक नाही की देवाच्या स्वभावाचे आकलन करण्याचा प्रश्न हा मनाच्या संघर्षाशिवाय होऊच शकत नाही, आणि याचे चित्रण याकोबाच्या देवदूताशी झालेल्या झुंजीतून स्पष्ट होते. याकोबाला ज्याच्याशी तो झुंजत होता त्याची खरी ओळख पटली नाही. त्याला असे वाटले की तो देवदूत त्याचा शत्रू आहे, त्याचा नाश करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे; परंतु प्रत्यक्षात तो त्याचा प्रेमळ तारणारा होता, जो त्याला वाचविण्यासाठी पाठविण्यात आलेला होता.

रात्रभर ख्रिस्तच याकोबाबरोबर होता, ज्याच्याशी तो झुंजत होता, आणि ज्याला त्याने चिकाटीने धरून ठेवले जोवर त्याने त्याला आशीर्वाद दिला नाही. {1SP 119.1}

याकोबाने ख्रिस्ताबरोबर ती झुंज सहन केली याचे एकच कारण होते.

सैतानाने देवदूतांपुढे याकोबावर आरोप केला होता, त्याच्या पापामुळे त्याला नष्ट करण्याचा आपल्याला अधिकार आहे असे त्याने सांगितले; त्याने एसावाला याकोबाविरुद्ध मोर्चा काढण्यासाठी प्रवृत्त केले; आणि दीर्घ रात्रीच्या कुस्तीमध्ये, सैतानाने त्याच्या अपराधाची जाणीव त्याच्यावर लादण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून तो खचून जाईल आणि देवावरची त्याची घट्ट पकड सुटेल. जेव्हा संकटात याकोबाने देवदूताला धरले आणि अश्रूंनी प्रार्थना केली, तेव्हा स्वर्गीय दूताने, त्याच्या विश्वासाची परीक्षा घेण्यासाठी, त्याला त्याच्या पापाची आठवण करून दिली आणि त्याच्यापासून सुटण्याचा प्रयत्न केला. पण याकोब मागे हटला नाही. त्याला समजले होते की देव दयाळू आहे, म्हणून त्याने स्वतःला त्याच्या दयेवर सोपविले. त्याने आपल्या पापाबद्दल केलेल्या पश्चात्तापाकडे निर्देश केला आणि सुटकेसाठी विनंती केली. त्याने आपल्या जीवनाचा आढावा घेतला तेव्हा तो जवळजवळ निराशेच्या काठावर पोहोचला; पण तरीही त्याने देवदूताला घट्ट धरून ठेवले आणि मनापासून, तळमळीतून प्रार्थना करत राहिला, जोपर्यंत तो यशस्वी झाला नाही.

असेच देवाच्या लोकांचे अनुभव त्यांच्या वाईटाच्या शक्तींशी शेवटच्या संघर्षामध्ये असतील. देव त्यांचा विश्वास, त्यांची चिकाटी आणि त्यांना सोडविण्याच्या त्याच्या

सामर्थ्यावरचा त्यांचा आत्मविश्वास यांची परीक्षा घेईल. सैतान त्यांना या विचाराने घाबरविण्याचा प्रयत्न करेल की त्यांची स्थिती निराशाजनक आहे; त्यांची पापे इतकी मोठी आहेत की त्यांना क्षमा मिळू शकत नाही. त्यांना त्यांच्या अपूर्णतेची तीव्र जाणीव होईल, आणि ते जेव्हा आपल्या जीवनाचा आढावा घेतील, तेव्हा त्यांच्या आशा कोसळतील. पण देवाच्या दयेचे महत्त्व आणि त्यांनी केलेला प्रामाणिक पश्चात्ताप याची आठवण करून, ते ख्रिस्ताद्वारे असहाय्य, पश्चात्ताप करणाऱ्या पाप्यांना दिलेल्या वचनांवर आधार घेऊन विनंती करतील. त्यांच्या प्रार्थनांना तात्काळ उत्तर मिळाले नाही म्हणून त्यांचा विश्वास डळमळणार नाही. ते देवाच्या सामर्थ्याला धरून राहतील, जसे याकोबाने देवदूताला धरून ठेवले होते, आणि त्यांच्या आत्म्याचा आवाज असा असेल: "जोपर्यंत तू मला आशीर्वाद देत नाहीस, तोपर्यंत मी तुला सोडणार नाही." (पितृ-प्रवक्ता २०१, २०२)

फक्त तेच लोक, जे या समजुतीला घट्ट धरून राहतात की आपला देव दयाळू आहे, त्यांनाच याकोबाप्रमाणे ख्रिस्ताचा आशीर्वाद मिळविण्यासाठी चिकाटीने धरून राहण्याचा आत्मविश्वास असेल. जुन्या करारमधील कथा आणि नवीन करारमधील ख्रिस्ताच्या विधानांमध्ये दिसणारा हा संघर्ष आपल्या मनात त्या बीजाला अंकुरण्यास वाव देतो, जे सैतानाने पेरले आहे की देव दयाळू नाही. जेव्हा आपण हे विरोधाभासी वाटणारे प्रश्न पाहतो, तेव्हा जर आपण शिकलो नसू की आपला पिता दयाळू आहे आणि आपण त्याच्या दयेवर विश्वास ठेवू शकतो, तर आपला हा संघर्ष फक्त आपल्या तारणाऱ्यासोबतच्या दीर्घ झगड्यात परिवर्तित होतो. आत्म्यात दडलेली कटुता या कथा वाचताना प्रकट होते. रिचर्ड डॉकिन्स, स्टीफन फ्राय आणि इतर यांसारख्या लोकांचे उदाहरण हेच दाखवते की सैतानाने पेरलेल्या खोट्या बीमुळे कटुता जन्माला आली आहे. हे खोटे देवाला निर्दयी हुकूमशहा म्हणून उभे करते, ज्यामुळे अनेकांच्या मनात देवाचा "फाशीचा निर्णय" तयार होतो. कारण या नव्या नास्तिकांचे उपदेश म्हणजे की देव मनमानी करणारा, हिंस्र आणि क्रूर आहे यामुळे अनेक जण त्याच्या अस्तित्वावरच विश्वास ठेवणे सोडून देतात.

याउलट, काहीजण देवाचा स्वभाव दयाळू असल्याचे सिद्ध करण्याच्या घाईत, आपल्या आई हवासारखे, देवाच्या वचनात भर घालतात. काहीजण सार्वत्रिकतेच्या जाळ्यात अडकतात, ज्यात शिकवले जाते की अखेरीस सर्वांचे तारण होईल. तर इतरजण उच्च टीकात्मक दृष्टिकोन स्वीकारतात आणि जुन्या कराराकडे फक्त

“त्या काळात तेवढेच शक्य होते” असे म्हणून बघतात. कोणताही मार्ग धरला तरी, पवित्र शास्त्राच्या सरळ वाचनावरील विश्वास कमी होत जातो आणि सर्पाला आपल्या फसवणुकीच्या पाशांनी आत्म्याचा गळा आवळू दिला जातो.

## सैतानाने देवाचे विकृत केलेले स्वरूप

सुरुवातीपासूनच सैतानाने देवाच्या स्वभावाचे चुकीचे चित्रण केले आहे.

देवाच्या लोकांची समज अंध झाली आहे, कारण सैतानाने देवाच्या स्वभावाचे विपर्यास केले आहे. आपला चांगला आणि कृपाळू प्रभू लोकांसमोर सैतानाच्या गुणांनी झाकलेला दाखविला गेला आहे, आणि जे पुरुष व स्त्रिया सत्याचा शोध घेत होते, त्यांनी इतक्या काळापासून देवाकडे चुकीच्या नजरेने पाहिले आहे की, त्याच्या तेजावर पसरलेले ढग दूर करणे कठीण झाले आहे. (१ निवडक संदेशे, पृ. ३५५)

सुरुवातीपासूनच सैतानाचा हेतू हा होता की, देवाला स्वतःच्या गुणधर्मांनी झाकावे, जेणेकरून लोक त्याला नाकारतील. आपण सैतानाचे कार्य स्त्रिया आणि मुलांची कत्तल करण्यात पाहतो, जे फ्रेंच क्रांतीत घडले.

ॲरास येथे, कैद्यांना जलद मृत्यू ही देखील क्रूर करुणा नाकारली गेली. लॉयर नदीच्या काठावर, सोम्यूरपासून समुद्रापर्यंत, प्रचंड थव्याने कावळे व गिधाडे एकमेकांत गुंतलेल्या नग्न मृतदेहांवर ताव मारत होते. ना लिंगाला, ना वयाला दया दाखविण्यात आली. त्या शापित सरकारने मारलेल्या तरुण मुलांची आणि सतरा वर्षांच्या मुलींची संख्या शेकड्यांनी मोजावी लागेल. आईच्या कुशीतील बाळांना खेचून काढले गेले आणि जॅकोबिनांच्या रांगांमध्ये एका भाल्यापासून दुसऱ्या भाल्यावर फेकले गेले. अवघ्या दहा वर्षांच्या अल्पकाळात असंख्य मानव प्राणघातकपणे नष्ट झाले.

हे सर्व सैतानानेच घडवून आणले. ह्याचसाठी तो शतकानुशतके काम करत होता. त्याची नीती सुरुवातीपासून शेवटपर्यंत फसवणुकीची आहे, आणि त्याचा अढळ हेतू हा आहे की, मानवावर शोक व दु:ख आणावे, देवाच्या हस्तकौशल्याचे विद्रूप व

मलिन चित्रण करावे, देवाच्या दयेच्या व प्रेमाच्या उद्दिष्टांचा नाश करावा, आणि अशा रीतीने स्वर्गालाही शोकात ढकलावे. मग आपल्या फसवणुकीच्या कलाकौशल्याने तो माणसांची मने अंध करतो, आणि आपल्या कृतींचा दोष देवावर ढकलायला त्यांना प्रवृत्त करतो, जणू हे सर्व दु:ख आणि शोक निर्माण करणारे प्रसंग सृष्टीकर्त्याच्या योजनेचा परिणाम आहेत. (महान संघर्ष, पृ. २८३, २८४)

सैतानच माणसांना, लिंग, वय याची पर्वा न करता, दया न दाखविता निर्दयपणे कत्तल करण्यास प्रवृत्त करतो. खरी परीक्षा ही आहे की शास्त्र चुकीने न घेता, प्रामाणिकपणे कसे वाचायचे, जेणेकरून ही वस्तुस्थिती उघड होईल. आपण जर गंभीर असू, तर कधी कधी आपला तारणारा ही आपला शत्रू आहे, जो आपल्याला हानी पोहोचवू इच्छितो, असे आपल्याला वाटेल; पण जर आपण देवाची दया जाणून घेतली असेल, तर आपण आशीर्वाद मिळेपर्यंत त्याला धरून राहू. माझा खोलवर ठाम विश्वास हा आहे की, आपल्या देवाच्या स्वभावाला योग्य रीतीने न समजणे हे सैतानाला त्या लोकांवर विजय मिळवू देईल, ज्यांनी सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न कधी केला नाही. आपाण आपल्या पित्याच्या स्वभावाचे सत्य जाणलेच पाहिजे. हे कार्य अत्यंत तातडीचे आहे, जर आपल्याला शेवटच्या पावसाखाली शिक्कामोर्तब व्हायचे असेल. जसे सैतानाचे पहिले काम देवाच्या स्वभावाचे चुकीचे चित्रण करणे होते, तसेच जगाला दिला जाणारा शेवटचा संदेश हा त्याच्या प्रेमाच्या स्वभावाचे प्रकटीकरण असेल.

देवाबद्दलच्या गैरसमजुतीचा अंधकार जगावर पसरत आहे. लोक त्याच्या स्वभावाचे ज्ञान हरवत आहेत. त्याचा गैरसमज आणि विपर्यास केला गेला आहे. या काळात देवाकडून एक संदेश घोषित केला जाणार आहे म्हणजे एक असा संदेश, जो आपल्या प्रभावात प्रकाशमान आहे आणि आपल्या सामर्थ्यात तारण करणारा आहे. त्याचा स्वभाव लोकांना प्रकट करायचा आहे. जगाच्या अंधारात त्याच्या तेजाचा प्रकाश पसरविला जाणार आहे त्याच्या चांगुलपणाचा, त्याच्या दयेचा आणि त्याच्या सत्याचा प्रकाश.

हेच कार्य संदेष्टा यशया यांनी या शब्दांत स्पष्ट केले आहे: सीयोनेस सुवार्ता सांगणारे, उंच डोंगरावर चढ; यरुशलेमेस सुवार्ता सांगणारे,आपला स्वर जोराने उंच कर; कर उंच, भिऊ नकोस; यहूदाच्या नगरांना म्हण, "तुमचा देव पाहा." पाहा, प्रभू परमेश्वर पराक्रम्यासारखा येत आहे; त्याचा भुज त्याचे प्रभुत्व चालवील; पाहा, वेतन त्याच्याजवळ आहे, व प्रतिफळ त्याच्या हाती आहे. (यशया ४०:९,१०)

जे वराच्या येण्याची वाट पाहतात, त्यांनी लोकांना सांगावे: “पहा, तुमचा देव!” जगाला दिला जाणारा शेवटचा दयाळू प्रकाशकिरण, जगाला दिला जाणारा शेवटचा दयेचा संदेश म्हणजे त्याच्या प्रेमाच्या स्वभावाचे प्रकटीकरण होय. (ख्रिस्ताच्या दृष्टांत, पृ. ४१५)

## कनान घेण्याची देवाची मूळ योजना

कानानचा ताबा इस्राएलाला मिळण्याबाबत, प्रभुने त्यांना हे कसे पूर्ण होईल ते सांगितले:

निर्गम २३:२७-३० ज्या ज्या लोकांच्या विरुद्‌ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील. मी त्यांना एका वर्षातच घालवून देईन असे नाही; तसे केले तर देश उजाड होईल आणि वनपशू फार होऊन तुला उपद्रव देतील. तुझी संख्या वाढून तू देशाचा ताबा घेशील तोपर्यंत मी हळूहळू तुझ्यापुढून त्यांना घालवून देईन.

येथे तलवारीच्या वापराचा काहीही उल्लेख नाही. इस्राएल मिसरमधून सुटले होते आणि तलवार न वापरता मिसरकरांचा पराभव झालेला त्यांनी पाहिला होता. प्रभुने कधीही त्यांना ‘वर जा आणि लढा’ असा आदेश दिला नव्हता. त्यांना युद्‌धाद्‌वारे तो देश मिळवावा, ही त्याची इच्छा नव्हती; तर त्याच्या आज्ञांचे काटेकोर पालन करून तो देश मिळवावा, हीच त्याची योजना होती. (पितृ-प्रवक्ता ३९२)

जेव्हा ते पहिल्यांदा कानानमध्ये प्रवेश करण्याची तयारी करत होते, तेव्हा त्या उपक्रमाला आताच्या तुलनेत फारच कमी अडचणी होत्या. देवाने आपल्या लोकांना वचन दिले होते की, जर त्यांनी त्याचा आवाज ऐकला व आज्ञा पाळल्या, तर तो त्यांच्या पुढे जाईल आणि त्यांच्या वतीने लढेल; आणि तो त्या भूमीतील रहिवाशांना हाकलून लावण्यासाठी मधमाश्याही पाठवील. (पितृ-प्रवक्ता ४३६)

# इस्राएलाचे देवाबदद्लचे भय

इस्राएलला मिसर देशातून सोडविताना देवाची इच्छा होती की त्यांनी त्याला ओळखावे आणि त्याच्यावर विश्वास ठेवायला शिकावे. मिसरमध्ये राहत असताना इस्राएली लोक सतत अत्याचाराच्या आत्म्याने वेढलेले होते. हिब्रू मुलांना नदीत फेकून देण्याच्या उदाहरणातून आणि मिसरमधील त्यांच्या कठोर अनुभवातून बरेच जण या समजुतीने प्रभावित झाले की देव हा एक अत्याचारी आहे, जो कधीही त्यांच्याविरुद्ध वळू शकतो आणि त्यांना ठार करू शकतो. हे भय सुरुवातीपासूनच दिसते:

निर्गम १४:११ ते मोशेला म्हणाले, “मिसरात काय कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हांला येथे रानात मरायला आणले? आम्हांला तू मिसरातून बाहेर आणले ते काय म्हणून?

हे भय थेट एदेनच्या बागेपर्यंत जाते, जेव्हा सैतानाने आदामला हे पटवून दिले की देव म्हणतोय “तुम्ही नक्कीच मराल,” म्हणजेच देवच त्यांना मारायला येईल.

उत्पत्ती ३:१० तो म्हणाला, “मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो.”

इस्राएल लोकांनी देवाविषयी असलेले हे भय मोशेवर आरोप करताना लपवून ठेवले. तरी हे स्पष्ट होते की मोशेने स्वतःच्या सामर्थ्याने लोकांना बाहेर काढले नव्हते. सैतान लोकांना या विचाराने फसवत होता की देव त्यांना वाळवंटात ठार करू इच्छितो. हे प्रलोभन केवळ यासाठी शक्य झाले कारण देवाच्या स्वभावाबद्दल त्यांची समज चुकीची होती. हे भय इस्राएल लोकांमध्ये सतत वाढत गेले:

निर्गम १६:३ इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, “आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे.”

इस्राएली लोक देवाविषयीचे त्यांचे भय उघडपणे व्यक्त करतात आणि असे म्हणतात की मिसरमध्ये देवाच्या हातून मेलेलो बरे, पण या सध्याच्या

परिस्थितीत जगणे नको. त्यांनी स्पष्टपणे देवावर विश्वास ठेवला नाही आणि त्यांच्या मनाला सैतानाने देवाच्या खऱ्या स्वभावाविषयी अंध केले होते.

## अमालेकसोबतचा एक महत्त्वाचा क्षण

निर्गम पुस्तकाच्या अगदी पुढच्या अध्यायात इस्राएली लोक देवाविषयीच्या त्यांच्या विकृत कल्पना अधिक स्पष्ट करतात:

निर्गम १७:३-४ पण तेथे लोकांना खूप तहान लागली आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले, “आम्हांला, आमच्या मुलांना व आमच्या गुराढोरांना तहानेने मारून टाकायला तू आम्हांला मिसर देशातून बाहेर का आणलेस?” मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, “ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत.”

ते सतत कुरकुर करत राहतात आणि मोशेवर आणि म्हणूनच देवावरही त्यांना ठार मारण्याचा आरोप करतात. हिंस्र देवाच्या त्यांच्या मूर्तिपूजक समजुतीचे रूपांतर मोशेला मारण्याच्या धमक्यांत होऊ लागते. हिंस्र देवाच्या या खोट्या प्रतिमेकडे पाहत राहिल्यामुळे ते हळूहळू त्याच प्रतिमेत रूपांतरित होत गेले, आणि मिसरमधून त्यांना सोडवण्यासाठी देवाने ज्याचा उपयोग केला त्या मनुष्याविरुद्ध हिंसक कृत्यांचे कट आखू लागले.

त्यांची सततची कुजबुज, कुरकुर आणि देवावरील अविश्वास यामुळे देव अशा स्थितीत आला की त्यांना संरक्षित करण्याची त्याची क्षमता कमी झाली. त्यांनी सैतानालाच आपला स्वामी म्हणून निवडले, आणि सैतान त्यांना नष्ट करण्यासाठी प्रवेशाची मागणी करू लागला. आपल्याला पाण्याबद्दलच्या तक्रारी आणि अमालेकांच्या हल्ल्यामधील संबंध पुढीलप्रमाणे दिसतो:

निर्गम १७:७-८ मोशेने त्या ठिकाणाचे नाव मस्सा आणि मरीबा असे ठेवले, कारण इस्राएल लोकांनी तेथे कलह केला आणि “परमेश्वर आमच्यामध्ये आहे किंवा नाही” असे म्हणून परमेश्वराची परीक्षा पाहिली. अमालेकाबरोबर युद्ध मग अमालेक

येऊन रफीदीम येथे इस्राएल लोकांशी लढू लागला.

प्रभुने आपल्या लोकांचा विश्वास तपासला, परंतु ते त्या परीक्षेत टिकू शकले नाहीत. त्यांनी अन्नाबद्दल, पाण्याबद्दल कुरकुर केली, आणि मोशेविरुद्ध तक्रार केली. त्यांच्या अविश्वासामुळे देवाने त्यांच्या शत्रूंना त्यांच्याशी युद्ध करण्याची परवानगी दिली, जेणेकरून तो आपल्या लोकांना दाखवू शकेल की खरी शक्ती कुठून येते. (1SP 228,229)

इस्राएलच्या अवज्ञेमुळे आणि देवापासून झालेल्या दूराव्यामुळे त्यांना कठीण परिस्थितीत आणले गेले आणि संकटांना सामोरे जावे लागले; त्यांच्या शत्रूंना त्यांच्याशी युद्ध करण्याची परवानगी देण्यात आली, जेणेकरून ते नम्र होतील आणि आपल्या अडचणींमध्ये व संकटांत देवाचा शोध घेतील. (2T 106)

इस्राएलच्या संततीच्या कुरकुरीमुळे सैतानाला अमालेकींना त्यांच्यावर हल्ला करण्यास प्रवृत्त करण्यासाठी एक दार खुले झाले. जर इस्राएलाने प्रभुवर विश्वास ठेवला असता, तर असे काही झाले नसते. अमालेकी त्यांना हात लावायलाही फार घाबरले असते. देवाविरुद्ध केलेल्या पापाबद्दल इस्राएलने पश्चात्ताप केला, याचा काहीही पुरावा दिसत नाही. त्यांनी देवाला एक अत्याचारी म्हणून पाहिले, जो त्यांना ठार करण्याच्या हेतूने पाहत होता. पाणी मिळाल्यावर त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली, याचा कुठेही पुरावा नाही. मोशेला त्यांनी न माफी मागितली, न आभार मानले. अशा प्रकारच्या कोणत्याही नोंदी नाहीत. उलट इस्राएली लोकांनी मोशेला ठार मारण्याची धमकी दिली होती. आपण कल्पना करू शकतो का की हे मोशेच्या मनाला किती खोलवर जखमी करणारे होते? तो आपल्या वाळवंटातील शांत घरात राहून आपल्या कुटुंबाची देखभाल करू शकला असता, आपल्या कळपांची निगा राखू शकला असता. इस्राएली लोक देवाविषयी दाखवत असलेली नीच कृतघ्नता त्याने खोलवर जाणवली असणार. त्याच्यासाठी ही खरीच एक मोठी परीक्षा ठरली. आणि मग अशा अवस्थेत त्याला बातमी मिळते की अमालेकी हल्ला करत आहेत आणि दुर्बलांना पकडून ठार करत आहेत. पुढे काय घडते, हे निर्णायक ठरणार होते. हा निर्णय निराशाजनक परिस्थितीत आणि प्रचंड दडपणाखाली घेतला गेला.

निर्गम १७:९ तेव्हा मोशेने यहोशवाला सांगितले, “आपल्यांतले काही पुरुष निवडून काढ आणि जाऊन अमालेकाशी युद्ध कर; उद्या मी देवाची काठी हाती घेऊन टेकडीच्या माथ्यावर उभा राहीन.”

## वारशाने मिळालेली तलवार

असे लिहिलेले नाही की, "आणि परमेश्वराने मोशेला आज्ञा केली." असेही लिहिलेले नाही की, मोशे पवित्रस्थानात गेला आणि परमेश्वराला विनवणी केली. फक्त एवढेच लिहिलेले आहे की, मोशेने यहोशवाला सांगितले, "जा आणि लढ." मी मनात ते दृश्य उभे करतो मोशे यहोशवाकडे चालत जात आहे तेव्हा सर्व काही जणू संथ गतीने पुढे सरकते आणि माझे विचार त्या रात्रीकडे झुकतात, जेव्हा अब्राहाम, लोटाला वाचविताना त्याने जे काही पाहिले होते त्याबद्दल मनात खोलवर चिंतेत बुडाला होता.

अब्राहाम आनंदाने आपल्या तंबूत आणि कळपांकडे परतला; पण त्याचे मन सतत छळणाऱ्या विचारांनी व्याकुळ झाले होते. तो शांतीप्रिय मनुष्य होता, शक्य तेथे वैर आणि संघर्ष टाळणारा; पण त्याने पाहिलेल्या रक्तपाताच्या दृश्याची आठवण त्याच्या मनात भय आणि तिरस्काराने पुन्हा जिवंत झाली. ज्यांना त्याने पराभूत केले होते, ती राष्ट्रे नक्कीच पुन्हा कनानवर आक्रमण करतील आणि सूड म्हणून त्याच्यावरच विशेष लक्ष्य साधतील, हे त्याला ठाऊक होते. (PP 136)

अब्राहाम जो आदामाप्रमाणे एका निर्णायक स्थानावर होता त्याने पुढील पिढ्यांसाठी वारशाने मिळणाऱ्या प्रवृत्तींचा मार्ग ठरविला. अब्राहामने तलवार उचलली यामुळे त्याच्या संततीवर "महाभयंकर अंधार" येणार होता, आणि त्या भीषण रात्री त्याने आपल्या हातात तलवार घेतल्यामुळे भयावह भविष्याची चाहूल स्वतः चाखली. माझे विचार पुढे शेकेम या खेड्याकडे वळतात, जिथे अब्राहामचे पणतू लेवी आणि शीमोन त्यांच्या अपमानित बहिणीच्या सूडाने ते तलवार हातात घेऊन रक्तपात घडवून आणतात.

उत्पत्ती ३४:२५-२९ तिसऱ्या दिवशी असे झाले की, ते बेजार असता याकोबाचे दोन मुलगे, म्हणजे दीनेचे भाऊ शिमोन व लेवी ह्यांनी आपापली तलवार हाती घेऊन त्या नगरावर अचानक छापा घातला आणि तेथील सर्व पुरुषांची कत्तल केली. हमोर व त्याचा मुलगा शखेम ह्यांचाही तलवारीने वध करून ते दीनेस शखेमाच्या घरातून काढून घेऊन गेले. मग याकोबाच्या मुलांनी त्या वध केलेल्यांवरून जाऊन ते नगर

लुटले, कारण त्यांनी त्यांची बहीण दीना हिला भ्रष्ट केले होते. त्यांची शेरडेमेंढरे, गाईबैल, गाढवे आणि त्या नगरातले व शेतातले होते नव्हते ते सारे त्यांनी घेतले. त्यांचे अवघे धन, त्यांची सर्व मुलेबाळे व स्त्रिया आणि त्यांच्या घरात जे काही सापडले ते सगळे हस्तगत करून त्यांनी लुटले.

अब्राहामाने आपल्या पुतण्याचे प्राण वाचवण्यासाठी केलेल्या कृतीचे बीज पुढे लेवी आणि शिमोन यांच्या आयुष्यात अधिक प्रचंड स्वरूपात प्रकट झाले, जेव्हा त्यांच्या इतर भावांनी कपटाने शेकेमकरांना सुंता करण्याची अट घालून त्यांना जाळ्यात अडकवले. याकोब खरोखरच आर्ततेने म्हणू शकला की त्याची संतती कनानी व परिझी लोकांच्या नजरेत कलंकित होईल आणि जशी त्यांनी तलवार उचलली होती, तशी तलवार पिढ्यानपिढ्या त्यांचा पाठलाग घेईल. आपण असे दृश्य पाहतो का की लेवीची मुले आपल्या पित्याची ही कहाणी सांगत होती की त्याने आपल्या बहिणीच्या बाजूने उभे राहत शेकेमकरांना ठार केले? लेवीची काही संतती या कृतीबद्दल अभिमान बाळगण्याचा मोह पडणार नाही काय की त्यांच्या पित्याने आपल्या बहिणीचे रक्षण केले? सैतानाने त्यांना असे सुचवले नसेल काय की त्याची कृती योग्य होती कारण ते आत्मसंरक्षण होते? आपल्या पूर्वजाला निर्दयी खून करणारा मानून त्याची लाज पिढ्यानपिढ्या वाहून नेण्यापेक्षा इतिहासाचे असे स्पष्टीकरण स्वीकारणे किती सोपे नसेल?

या सर्व इतिहासाचा प्रवाह आता मोशेच्या पावलांबरोबर यहोशवाकडे जात आहे. माझा विचार मोशेच्या जीवनातील आधीच्या घटनेकडे सरकतो. आपल्या लोकांपैकी एकाचे रक्षण करण्याचा तोच मोह मोशेसमोर आला होता जेव्हा एका मिसरी गुलाम-मालकाने त्याच्या एका नातलगाला मारहाण केली. त्याच्या वडिलाप्रमाणेच लेवीचा उग्र संताप त्याच्यात उफाळून आला; तलवार उगारली गेली आणि राग शमवला गेला.

मोशेने मिसरी मनुष्याला ठार मारण्यात घाई केली. त्याला असे वाटले की इस्राएली लोकांना समजेल की देवाच्या विशेष योजनेंतर्गत त्याला त्यांना सोडवण्यासाठी उठवले आहे. पण प्रभूने हे कार्य मोशेसारखे युद्धाद्वारे पूर्ण करायचे ठरवले नव्हते, तर स्वतःच्या सामर्थ्याने, जेणेकरून सर्व गौरव केवळ त्याच्याच नावे जाईल. तरीसुद्धा ही उतावळी कृती देखील देवाने आपल्या हेतूसाठी वळवून घेतली. — ST, 19 फेब्रुवारी, 1880

चाळीस वर्षे जंगलात राहून मोशे स्वतःच्या निर्णयांवर आधारलेले आपल्या लोकांचे रक्षण करण्याच्या मोहातून मुक्त झाला होता काय? मोशेला हे कळाले होते काय की अमालेकी लोकांनी आधीच छावणीतल्या काही दुर्बळांना ठार मारले होते? आपल्या मृत्यूच्या आधी मोशेने हे आठवले:

अनुवाद २५:१७-१९ तुम्ही मिसर देशातून बाहेर निघालात तेव्हा वाटेने अमालेक तुमच्याशी कसा वागला ह्याची आठवण ठेवा; वाटेत तुला गाठून तू थकला भागलेला असताना त्याने देवाला न भिता दमून मागे पडलेल्या तुझ्या सगळ्या लोकांवर हल्ला चढवून त्यांना ठार मारले. म्हणून तुझा देव परमेश्वर जो देश तुला वतन म्हणून देत आहे त्यात चोहोकडल्या सर्व शत्रूंपासून तुझा देव परमेश्वर ह्याने तुला विश्राम दिल्यावर अमालेकाची आठवण पृथ्वीतलावरून बुजवून टाक; विसरू नकोस.

हे सर्व काही एकत्र आले होते काय जसे सैतानाने ठरवले होते ज्यायोगे इस्राएल पुन्हा तलवार उचलेल आणि जगाच्या नजरेत कलंकित होईल? हे सैतानाचेच नियोजन होते काय, की देवाच्या स्वभावाचे चुकीचे चित्रण युगानुयुगे होत राहावे म्हणून? इस्राएली स्वतःच देवाच्या स्वभावाचा गैरसमज करून बसले होते; तर मग तलवार उचलणे हे केवळ त्या देवाचे प्रगटीकरण नव्हते काय जो देव त्यांनी स्वतःच्या कल्पनेत घडवला होता? जर हा कथित देव त्यांना आवश्यक तेव्हा पाणीही देऊ शकत नसेल, तर अमालेकींच्या हातून ते मरत असताना त्याला याची कितीशी पर्वा असेल?

प्रेरणा आपल्याला सांगते की देवाने कधीही वचनभूमी जिंकण्यासाठी युद्धाचा मार्ग निवडलेला नव्हता. मग असे ठामपणे म्हणणे सुरक्षित नाही काय की अमालेकींशी तलवारीने लढण्यासाठी यहोशवाला बोलावण्याची ही कृती ज्यासाठी ना आदेश होता ना प्रार्थना व जे देवाच्या योजनेत कधीच नव्हते? इस्राएलला अमालेकांवर विजय मिळवण्यासाठी जो महान संघर्ष झाला आणि ज्यासाठी प्रदीर्घ व मनापासून प्रार्थना आवश्यक ठरल्या, यावरून स्पष्ट होते की हा देवाचा मूळ हेतू नव्हता. तरीसुद्धा देवाने त्यांना हा मार्ग चालू दिला, कारण बहुतेक इस्राएली देवाला हिंस्र व युद्धप्रिय मानत होते. जेव्हा मिसरांचा संहार करण्यास सैतानाला मुभा देण्यात आली, तेव्हा त्या संपूर्ण काळात तो इस्राएली लोकांना हेच पटवून सांगत होता की त्यांचा देवच या

गोष्टी करीत आहे. मिसरमधील संकटांच्या घटनांचे स्पष्टीकरण जाणून घेण्यासाठी "मिसरामधील कालवरी" हे पुस्तक पहा.

एकदा तलवार उचलण्याचे पाऊल उचलले की पुन्हा तलवारीचा आधार न घेणे फारच कठीण होते. अमालेकांबरोबरच्या घटनांनंतर देवाने त्यांना सांगितले की तलवारीचा वापर न करता एक वेगळा मार्ग त्याच्याकडे आहे (निर्गम 23:27-30). पण इस्राएल लोकांना देवाचा खरा स्वभाव दिसेपर्यंत त्यांना पुन्हा पुन्हा तलवार उचलण्याचा मोह होत राहणार होता.

कोरह, दाथान, अबीराम आणि २५० अधिपतींच्या गोष्टीत आपण पाहतो की, देव त्यांना जंगलात ठार करणार या भीतीमुळे त्यांनी मोशे आणि अहरोन यांच्या ऐवजी दुसरे नेतृत्व शोधले. आणि जेव्हा ते कनानच्या सीमेजवळ आले तेव्हा त्यांनी त्या भूमीबद्दल वाईट अहवाल दिला, कारण त्यांना विश्वास बसत नव्हता की देव त्यांच्यावर प्रेम करतो आणि त्यांच्या भल्यासाठी कार्य करेल. त्यांनी देवाचे सर्व संरक्षण व काळजी दुर्लक्षित केली आणि केवळ नकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित केले. या बाबतीत सैतानाला त्यांना फसवणे अगदी सोपे होते, कारण ते अशा देवावर विश्वास ठेवत होते जो त्यांना ठार करायला पाहत होता आणि जो कधीही आपले मन बदलू शकतो. जेव्हा जेव्हा सैतानाला त्यांच्या संरक्षणाच्या कुंपणात प्रवेश करून इस्राएली लोकांना इजा करण्याची परवानगी मिळाली, तेव्हा तो त्यांना हेच पटवून देत असे की देव स्वतः आपल्या हाताने थेट त्यांना शिक्षा करत आहे. आपल्या लोकांनी स्वतःबद्दल अशा प्रकारच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवणे देवासाठी किती दुःखदायक असले पाहिजे!

गणना १४:२-३ सर्व इस्राएल लोक मोशे आणि अहरोन ह्यांच्याविरुद्ध कुरकुर करू लागले; सर्व मंडळी त्यांना म्हणाली, “आम्ही मिसर देशात मेलो असतो तर बरे झाले असते किंवा ह्याच रानात मेलो असतो तरी बरे झाले असते. तलवारीने आमचा निःपात व्हावा म्हणून परमेश्वर आम्हांला ह्या देशात का नेत आहे? आमच्या बायकामुलांची लूट होईल! आम्ही मिसर देशात परत जावे हेच बरे नव्हे काय?”

गणना १४:२२-२३ आणि ह्या सर्व लोकांनी माझा महिमा आणि मिसर देशात व रानात मी केलेली चिन्हे पाहूनही दहादा माझी परीक्षा पाहिली आणि माझे सांगणे ऐकले नाही; म्हणून जो देश मी त्यांच्या पूर्वजांना शपथपूर्वक देऊ केला आहे तो खरोखर त्यांच्या दृष्टीस पडायचा नाही; ज्यांनी मला तुच्छ लेखले त्यांतले कोणीही

तो देश पाहणार नाहीत.

जेव्हा इस्राएल लोकांना त्यांच्या पापामुळे भूमी मिळवण्यासाठी वर जाता येणार नाही असे सांगण्यात आले, तेव्हा त्यांनी पुन्हा बंड केले आणि देवाने आदेश दिला नव्हता तरी वर जाऊन लढायचे ठरवले.

## चाळीस वर्षांनंतर...

इस्राएल लोकांनी वारंवार असे जाहीर केले होते की त्यांना भीती वाटते की देव त्यांना जंगलात ठार मारेल. आपण पुढे थोडे सविस्तर पाहू, की देवाने त्यांच्या स्वतःच्या देवाविषयीच्या कल्पनेलाच त्यांच्यावर न्याय करु दिला. एक संपूर्ण पिढी जंगलात नाश पावली त्या संहारकाच्या हातून, ज्याने त्यांना या मूर्तिपूजेत फसवले होते की देव म्हणजे असा जो त्यांना जंगलात ठार मारू इच्छितो.

ईयोब ३:२५ मला कशाचीही भीती वाटली तर तेच माझ्यावर येते. कशानेही मला थरकाप झाला तर ते माझ्यावर येते.

ईयोबाला फार मोठी भीती वाटत होती की त्याच्यावर आपत्ती कोसळेल. हे त्याच्या जीवनात घडले, त्याला कारण त्याच्या भीतीत काही भाग होता काय? नवीन जागतिक व्यवस्थेची (एक नियम प्रणाली) आणि मृत्यू छावण्यांची सतत मनात घर करून बसलेली भीती हे खरोखरच सैतानाला ते घडवून आणण्यासाठी संधी मिळवून देऊ शकते काय?

जेव्हा चाळीस वर्षे संपली आणि एक अख्खी पिढी मृत्यू पावली, तेव्हा ते पुन्हा सीमेजवळ आले. पित्यांचे पाप अजूनही त्यांच्या मुलांच्या तोंडातच होते.

गणना २१:५ ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध असे बोलू लागले की, “तुम्ही आम्हांला मिसर देशातून काढून ह्या रानात मरायला कशाला आणले? येथे तर अन्न नाही व पाणीही नाही, आणि ह्या हलक्या अन्नाला आम्ही कंटाळलो आहोत.”

ते दक्षिणेकडे त्यांच्या प्रवासात पुढे जात असताना त्यांचा मार्ग एका उष्ण, वाळुमय दरीतून गेला जिथे सावली नव्हती, हिरवळ नव्हती. तो मार्ग लांब आणि कठीण

